लालचुटूक रंगाची स्ट्रॉबेरी ग्राहकांचे लक्ष वेधून घेत आहे.

# 'नव्या शैक्षणिक धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रयत्न करा'

## मॉडर्न महाविद्यालयाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाची सांगता



मॉडर्न महाविद्यालच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त विशेषांकाचे प्रकाशन राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रा.डॉ. गजानन एकबोटे, डॉ. नितीन करमळकर, महापौर मुरलीधर मोहोळ आदी उपस्थित होते.

**पुणे :** नव्या शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी शैक्षणिक संस्थांनी प्रयत्न करावेत, असे सांगून प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीमध्ये आजवर अनेक विद्यार्थ्यांनी नावलौकिक मिळवल्याबद्दल विद्यार्थ्यांचे व संस्थेचे राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांनी कौतुक केले. आधुनिकीकरणाकडे वाटचाल करताना आपली मातृभूमी, मातृभाषा, सदाचार आणि आपल्या संस्कृतीला विसरू नका, असेही यावेळी कोश्यारी यांनी नमूद केले.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाच्या सांगता समारंभात राज्यपाल भगतसिंग कोश्यारी बोलत होते. यावेळी महापौर मुरलीधर मोहोळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. नितीन करमळकर, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष प्रा.डॉ.गजानन एकबोटे, प्रा.सुरेश तोडकर उपस्थित होते. यावेळी सेंट्रल सॉफिस्टीकेटेड ॲनालेटिकल इन्स्ट्रुमेंटेशन फॅसीलिटी आणि प्रिन्सिपल व्हर्च्युअल केबीनचे डिजिटल स्वरुपात अनावरण व सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त विशेषांकाचे प्रकाशन राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच प्रा.डॉ. गजानन एकबोटे व प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव यांना राज्यपाल कोश्यारी यांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

प्रा.डॉ.गजानन एकबोटे म्हणाले, दर्जेदार शिक्षण देण्यासाठी आमच्या संस्थेने नेहमीच भर दिला आहे.

◆ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर म्हणाले, विद्यार्थ्यांना आवश्यक त्या सोयी-सुविधा उपलब्ध करून देऊन त्यांना दर्जेदार शिक्षण देणे, तसेच त्यांना आपल्या शैक्षणिक संस्थेत टिकवून ठेवणे हे आव्हान असते. विद्यार्थी हिताचे नावीन्यपूर्ण अभ्यासक्रम तयार करून त्यांना स्वतःच्या पायावर सक्षमपणे उभे करणे महत्त्वाचे असते. हे काम मॉडर्न महाविद्यालयात विविध शैक्षणिक उपक्रम राबविण्यात येत असल्याचे त्यांनी कौतुक केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेच्या सहकार्यवाह प्रा. ज्योत्स्ना एकबोटे यांनी केले. संस्थेच्या वाटचालीबाबत प्रा. डॉ. अंजली सरदेसाई यांनी माहिती दिली. सूत्रसंचालन संस्थेचे कार्यवाह प्रा. शामकांत देशमुख यांनी केले, तर प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव यांनी आभार मानले.